| MHYA070007492019 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | : | २९/०४/२०१९ |
| | नोंदणी क्रमांक | : | २९/०४/२०१९ |
| | निकाल दिनांक | : | ११/०८/२०२६ |
| | कालावधी | : | व. म. दि. |
| | | | ०७ ०३ १३ |

**दारव्हा येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी श्री निलेश ल. पाटील)**
**न्यायनिर्णय घोषीत दिनांक ११/०८/२०२६**
**(नियमित फौजदारी खटला क्रं. ६४/२०१९)**

**गुन्हा नोंद क्रं.३८०/२०१८ पोलीस स्टेशन लाडखेड निशाणी क्र.३१**

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी/तक्रारदार** | | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत पोलीस निरीक्षक,<br>**लाडखेड** पोलीस स्टेशन, दारव्हा. |
| **अभियोग पक्षातर्फे** | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री सी. बी. ऊके |
| **आरोपी** | | **इसराईल कुरेशी नाजीर कुरेशी**<br>**वय**–४० वर्ष, **व्यवसाय**–मजुरी<br>रा.महागांव कसबा, ता. दारव्हा, जि.यवतमाळ |
| **आरोपीतर्फे विधीज्ञ** | | **श्री. एम. एम. खान** |

## भाग – ब

## (फौजदारी आदेशिकाचे प्रकरण ५ मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये )

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | ३०/११/२०१८ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | ३०/११/२०१८ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | २६/०४/२०१९ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :– | १७/०७/२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | १५/०२/२०२३ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | १०/०८/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | ११/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | ११/०८/२०२६ |

## आरोपींची माहिती

| आरोपी | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम अन्वये समायोजित करणयाबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **इसराईल कुरेशी नाजीर कुरेशी** | दिनांक ३०/११/२०१८ | दिनांक ०१/१२/२०१८ रोजी जामिनावर सोडले | महाराष्ट्र प्राणी संरक्षण सुधारणा अधिनियम ५(अ), (क) | गुन्हा सिध्द झाला | न्यायालय उठेपर्यंत शिक्षा व महाराष्ट्र प्राणी संरक्षण सुधारणा अधिनियम ५(अ) नुसार रक्कम रुपये ८,०००/–, ५(क) नुसार रक्कम रुपये २,०००/– दंड | निरंक |

## भाग – क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण ६ मधील परिच्छेद ....अन्वये )

सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयील साक्षीदार

अ. अभियोग पक्ष

| सा.क्रं. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १ | गजानन जयराम राऊत | फिर्यादी | १७ |
| २ | इंदल महादेव चव्हाण | घटनास्थळ पंच | २९ |

**न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १ | ११ | दोषारोप |
| २ | १२ | आरोपीचे निवेदन |
| ३ | १८ | फिर्यादीवरील सही |
| ४ | १९ | प्रथम खबरी अहवालावरील सही |
| ५ | २८ | आरोपीचा गुन्हा कबुली अर्ज |

**न्यायनिर्णय**

(दिनांक ११/०८/२०२६ रोजी घोषीत केले )

आरोपीविरुध्द महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, १९७६ चे कलम ५–अ व ५–क अन्वये दोषारोप पत्र दाखल केले आहे.

**अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे**

०२. दिनांक ३०/११/२०१८ रोजी रात्री ०१.०० वाजता मौजे महागांव कसबा येथे आरोपीने गाय व वासरू कत्तलीच्या उद्देशाने आपल्या ताब्यात ठेवून

महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमाच्या कलम ५–अ अन्वये अपराध केला तसेच त्याच दिनांक, वेळी व ठिकाणी गाय व वासराचे मांस आपल्या ताब्यात ठेवून कलम ५–क अन्वये अपराध केला, असा आरोप निश्चित करण्यात आला होता. आरोपीने सुरुवातीस सदर आरोप नाकारले होते व त्यानुसार नियमित खटल्याची कार्यवाही सुरू झाली होती.

**०३.** अभियोग पक्षाच्या प्रकरणानुसार, दिनांक ३०/११/२०१८ रोजी पहाटेच्या सुमारास आरोपी त्याच्या राहत्या घरामध्ये गाय व गायीच्या वासराची कत्तल करीत असल्याची माहिती फिर्यादी गजानन जयराम राऊत यास मिळाली. त्यावरून फिर्यादी व इतर व्यक्तींनी आरोपीच्या घराजवळ जाऊन पाहणी केली. त्यानंतर आरोपीच्या घरात प्रवेश केला असता आरोपी गायीच्या मासांचे तुकडे वेगवेगळे करीत असल्याचे व घरातील बाथरूममध्ये करड्या रंगाचे गायीचे वासरू मानेजवळ कापलेल्या अवस्थेत मृत पडलेले असल्याचे दिसून आल्याचे अभियोग पक्षाचे म्हणने आहे. त्यानंतर पोलिसांना माहिती देण्यात आली.

**०४.** पोलिसांनी घटनास्थळी येऊन घटनास्थळ पंचनामा केला व मृत वासराचे शरीर, कातडी, अवयव व इतर संबंधित मुद्देमाल जप्त केला. तसेच कत्तलीसाठी वापरण्यात आल्याचे नमूद असलेली शस्त्रे जप्त करण्यात आली. मृत वासराचे शवविच्छेदन करण्यात आले व तपासादरम्यान प्राप्त नमुने रासायनिक

विश्लेषणासाठी पाठविण्यात आले. तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात सादर करण्यात आले.

०५. माझे पुर्वपिठासिन अधिकारी यांनी दिनांक १७/०७/२०१९ रोजी आरोपीविरुध्द महाराष्ट्र प्राणी संरक्षण सुधारणा अधिनियम कलम ५–अ, ५–ब अन्वये निशाणी क्र.११ कडे दोषारोप नोंदविण्यात आला. सदर दोषारोप आरोपीस त्याच्या मातृभाषेत समजावून सांगण्यात आला असता गुन्हा मान्य नसल्याचे नमूद करुन संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शवली.

## कारणमिमांसा

०६. अभियोग पक्षाने आपल्या प्रकरणाच्या समर्थनार्थ साक्षीदार तपासले. साक्षीदार क्र.१ गजानन जयराम राऊत यांची साक्ष निशाणी क्र. १७ वर नोंदविण्यात आली. ते या प्रकरणातील फिर्यादी आहेत. त्यांनी आरोपीस ओळखत असल्याचे सांगून, दिनांक ३०/११/२०१८ रोजी पहाटेच्या सुमारास आरोपीच्या घरात गाय व वासराची कत्तल होत असल्याचे पाहिल्याचे नमूद केले. त्यांच्या म्हणण्यानुसार, ते व त्यांच्यासोबत असलेल्या इतर व्यक्ती आरोपीच्या घरात गेले असता आरोपी गायीच्या मासांचे तुकडे वेगवेगळे करीत होता व बाथरूममध्ये वासरू मानेजवळ कापलेल्या अवस्थेत मृत पडलेले होते. त्यांनी पोलिसांना फोन केल्याचे, घटनास्थळ पंचनामा करण्यात आल्याचे व मृत वासरू तसेच संबंधित मुद्देमाल पोलिसांनी जप्त केल्याचे

नमूद केले. त्यांनी पोलीस ठाण्यात दिलेला जबानी रिपोर्ट व प्रथम खबरी अहवालावरील आपल्या स्वाक्षऱ्या ओळखल्या. न्यायालयात दाखविण्यात आलेली शस्त्रेही त्यांनी ओळखली.

०७. साक्षीदार क्र. १ यांच्या उलटतपासणीत आरोपीच्या घरास ७ ते ८ फूट उंचीची कंपाउंड भिंत व दोन लोखंडी गेट असल्याचे तसेच रस्त्यावरून उभे राहून घराच्या आतील घटना सहजपणे दिसुन येत नसल्याचे त्यांनी मान्य केले. ते स्वतः व इतर १० ते १२ लोक आरोपीच्या घरात प्रवेश केल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या पोलीस जबाबातील काही बाबी नोंदविण्यात न आल्याबाबत त्यांना कारण सांगता आले नाही. तथापि, आरोपीस खोटे गुंतविण्यासाठी तक्रार दिल्याचे त्यांनी नाकारले. साक्षीदार क्र.२ ईंदल महादेव पक्ष यांची साक्ष निशाणी क्र.२९ वर नोंदविण्यात आली. ते घटनास्थळ व जप्ती पंचनाम्याचे पंच साक्षीदार आहेत. त्यांनी पंचनाम्यावरील आपल्या स्वाक्षऱ्या ओळखल्या; मात्र पंचनाम्याची कार्यवाही त्यांच्या समक्ष झाल्याचे व त्यांच्या समक्ष मुद्देमाल जप्त झाल्याचे नाकारले. त्यामुळे ते अभियोग पक्षास प्रतिकुल ठरले व अभियोग पक्षाने त्यांची उलटतपासणी केली. त्यांच्या साक्षीतून अभियोग पक्षाच्या पंचनामा कार्यवाहीस अपेक्षित साहाय्य मिळालेले नाही.

०८. सदर प्रकरणाच्या प्रलंबित कार्यवाहीदरम्यान आरोपीने दिनांक १०/०८/२०२६ रोजी निशाणी क्र.२८ वर फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या

कलम २६५–ब अन्वये Plea Bargaining करण्यासाठी अर्ज दाखल केला. सदर अर्जासोबत आरोपीने स्वतंत्र शपथपत्र दाखल केले आहे. सदर अर्जामध्ये आरोपीने नमूद केले आहे की, त्याने त्याच्याविरुद्ध असलेल्या आरोपांचे स्वरूप, संबंधित कायदेशीर तरतुदी, त्याचे कायदेशीर परिणाम व संभाव्य शिक्षेचे स्वरूप समजून घेतले असून, तो स्वतःच्या इच्छेने Plea Bargaining चा मार्ग स्वीकारत आहे. त्याच्यावर कोणत्याही व्यक्तीकडून दबाव, धमकी, जबरदस्ती, प्रलोभन किंवा अनुचित प्रभाव टाकण्यात आलेला नाही, असेही त्याने नमूद केले आहे. तसेच त्यास पूर्वी समान स्वरूपाच्या अपराधात दोषसिद्धी झालेली नाही, असे त्याने शपथपत्राद्वारे सांगितले आहे. सदर अर्जावर विद्वान सहायक सरकारी अभियोक्त्यांनी आपले म्हणणे दाखल केले.

०९. Plea Bargaining चा अर्ज व शपथपत्र दाखल झाल्यानंतर, आरोपीची Plea Bargaining करण्याची इच्छा स्वेच्छेची आहे किंवा नाही, तसेच आरोपीस त्याच्याविरुद्ध असलेल्या आरोपांचे स्वरूप, त्याचे कायदेशीर परिणाम व शिक्षेचे स्वरूप याची पुरेशी जाणीव आहे किंवा नाही, याची न्यायालयीन खात्री करण्यासाठी आरोपीस निशाणी क्र. २९ वर स्वतंत्र नोटीस देण्यात आली. सदर नोटीसमध्ये आरोपीस दिनांक ११/०८/२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता आपल्या विधिज्ञासह न्यायालयात हजर राहून, त्याने आरोपित गुन्हा स्वेच्छेने कबूल

केला आहे किंवा कसे, तसेच Plea Bargaining ची प्रक्रिया कोणत्याही दबाव, धमकी, प्रलोभन किंवा अनुचित प्रभावाशिवाय स्वीकारली आहे किंवा कसे, याबाबत आपले म्हणणे स्पष्ट करण्यास सांगण्यात आले.

१०. दिनांक ११/०८/२०२६ रोजी आरोपी त्याच्या विधिज्ञासह न्यायालयात हजर झाला. न्यायालयाने आरोपीशी स्वतंत्रपणे संवाद साधून त्यास त्याच्याविरुद्ध निश्चित करण्यात आलेल्या आरोपांचे स्वरूप, संबंधित कायदेशीर तरतुदी, Plea Bargaining चे परिणाम आणि संभाव्य शिक्षेचे स्वरूप समजावून सांगितले. त्यानंतर आरोपीने स्पष्टपणे सांगितले की, त्याने Plea Bargaining चा अर्ज स्वतःच्या इच्छेने दाखल केला असून त्याच्यावर कोणताही दबाव, धमकी, जबरदस्ती, प्रलोभन किंवा अनुचित प्रभाव नाही. त्याने त्याच्याविरुद्ध निश्चित करण्यात आलेल्या आरोपांबाबत दोष स्वीकारला असून, Plea Bargaining ची कार्यवाही स्वेच्छेने स्वीकारत असल्याचे न्यायालयास स्पष्टपणे सांगितले. आरोपीच्या विधिज्ञानेही आरोपीस Plea Bargaining च्या परिणामांची जाणीव असून, त्याने आपल्या विधिज्ञाच्या सल्ल्याने व पूर्ण समजुतीने सदर अर्ज दाखल केला असल्याचे स्पष्ट केले.

११. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मधील Chapter XXIA मध्ये Plea Bargaining संबंधी तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. कलम २६५–अ

नुसार, कायद्यातील अपवादांच्या अधीन राहून निर्धारित मर्यादेतील शिक्षेचे अपराध Plea Bargaining च्या प्रक्रियेत येतात. कलम २६५–ब नुसार आरोपीस ज्या न्यायालयात अपराधाचा trial प्रलंबित आहे त्या न्यायालयात Plea Bargaining साठी अर्ज करण्याची मुभा आहे आणि त्या अर्जासोबत आरोपीने सदर अर्ज स्वेच्छेने, अपराधाचे स्वरूप व शिक्षेचे स्वरूप समजून दाखल केल्याचे शपथपत्र सादर करणे अपेक्षित आहे. सदर प्रकरण सन २०१९ पासून प्रलंबित असून Plea Bargaining चा अर्ज दिनांक १०/०८/२०२६ रोजी दाखल करण्यात आला आहे. आरोपीचा अर्ज, त्यासोबतचे शपथपत्र, त्याची न्यायालयासमोर नोंदविलेली स्पष्ट भुमिका व त्याच्या विधिज्ञांची उपस्थिती यांचा एकत्रित विचार करता, सदर Plea Bargaining अर्ज आरोपीने स्वेच्छेने व कोणत्याही दबावाशिवाय दाखल केला असल्याबाबत या न्यायालयाचे समाधान झाले आहे.

१२. Plea Bargaining ची कार्यवाही ही केवळ आरोपीकडून दोष कबूल करून घेण्याची प्रक्रिया नसून, कायद्याने निश्चित केलेल्या पद्धतीने प्रकरणाचा समाधानकारक निपटारा करण्याची प्रक्रिया आहे. आरोपीने अपराधाची कबुली दिली असून, अभियोग पक्षानेही त्यासंबंधी आपली भूमिका मांडली आहे. आरोपीने न्यायालयाने ठरविलेली शिक्षा व दंड स्वीकारण्याची तयारी दर्शविली आहे. त्यामुळे प्रकरणाचा satisfactory disposition होण्यासाठी आवश्यक बाबी पूर्ण

झालेल्या आहेत, असे या न्यायालयाचे मत आहे.

१३. आरोपीने न्यायालयासमोर स्पष्ट व स्वेच्छेने आरोप कबूल केले आहेत. त्याच्या कबुलीपूर्वी त्यास आरोपांचे स्वरूप, कायदेशीर परिणाम व संभाव्य शिक्षा समजावून सांगण्यात आली आहे. आरोपीने कोणत्याही दबावाशिवाय दोष स्वीकारला आहे. त्यामुळे Plea Bargaining च्या प्रक्रियेनुसार आरोपीस त्याच्याविरुद्ध निश्चित करण्यात आलेल्या आरोपांबाबत दोषी ठरविणे योग्य आहे. महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, १९७६ च्या संबंधित तरतुदींनुसार अशा प्रकारच्या अपराधास दंडनीय शिक्षा निर्धारित करण्यात आलेली आहे. सदर कायद्याचा उद्देश गोवंशाचे संरक्षण करणे व कायद्याने प्रतिबंधित कृत्यांना आळा घालणे हा आहे. त्यामुळे शिक्षेचा प्रश्न ठरविताना आरोपीची वैयक्तिक परिस्थिती याबरोबरच अपराधाचे स्वरूप व विशेष कायद्याचा उद्देश यांचाही विचार करणे आवश्यक आहे.

१४. आता आरोपीस Probation of Offenders Act किंवा उपलब्ध इतर कायदेशीर तरतुदींनुसार probation वर सोडावे किंवा शिक्षा द्यावी, हा प्रश्न विचारार्थ येतो. आरोपी हा प्रथम अपराधी आहे व त्याच्याविरुद्ध पूर्वीची दोषसिद्धी अभिलेखावर नाही, ही बाब निश्चितपणे आरोपीच्या बाजूने विचारात घेण्यासारखी आहे. त्याचप्रमाणे, आरोपीने स्वतःहून Plea Bargaining चा मार्ग स्वीकारला असून, त्याने आपल्या विधिज्ञाच्या उपस्थितीत व पूर्ण समजुतीने आरोप कबूल केले आहेत.

त्याने न्यायालयीन प्रक्रियेस सहकार्य केले आहे. तसेच, सदर प्रकरण दिनांक ३०/११/२०१८ च्या घटनेशी संबंधित असून सन २०१९ पासून न्यायालयात प्रलंबित आहे. आरोपीने दीर्घकाळ न्यायालयीन कार्यवाहीस सामोरे जाऊन शेवटी Plea Bargaining स्वीकारली आहे. त्यामुळे त्यास शिक्षेच्या प्रमाणात निश्चितच लाभ देणे आवश्यक आहे.

**१५.** तथापि, केवळ आरोपी हा प्रथम अपराधी आहे किंवा त्याने अपराधाची कबुली दिली आहे, एवढ्याच कारणावरून त्यास probation वर सोडणे आवश्यक ठरत नाही. Probation चा लाभ देताना अपराधाचे स्वरूप, अपराधाचा समाजावर होणारा परिणाम, संबंधित विशेष कायद्याचा उद्देश, आरोपीचे आचरण व प्रकरणातील एकूण परिस्थिती यांचा विचार करणे आवश्यक आहे. सदर प्रकरणातील अपराध हा महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमासारख्या विशेष कायद्यातील प्रतिबंधात्मक तरतुदींच्या उल्लंघनाशी संबंधित आहे. सदर कायद्याचा उद्देश गोवंशाचे संरक्षण करणे आणि प्रतिबंधित कत्तल व संबंधित कृत्यांना आळा घालणे हा आहे. त्यामुळे अशा अपराधाकडे केवळ आरोपीच्या वैयक्तिक परिस्थितीच्या दृष्टीने पाहणे योग्य होणार नाही.

**१६.** अभियोग पक्षाच्या पुराव्यानुसार आरोपीच्या घरातून कत्तल केलेल्या वासराचे मृत शरीर, कातडी व इतर अवशेष जप्त करण्यात आल्याचे अभियोजनाचे

म्हणणे आहे. साक्षीदार क्र. १ हा फिर्यादी साक्षीदार असून त्याने आरोपीच्या घरातील परिस्थितीबाबत साक्ष दिली आहे. साक्षीदार क्र. २ पंच साक्षीदार अभियोजनास पूर्णतः सहाय्यकारी ठरलेला नसला, तरी आरोपीने Plea Bargaining च्या स्वतंत्र कार्यवाहीमध्ये स्वतःहून व स्पष्टपणे दोष स्वीकारला आहे. त्यामुळे आरोपीची दोषसिद्धी ही केवळ विवादित साक्षीच्या आधारे करण्याची परिस्थिती नसून, आरोपीच्या स्वेच्छेच्या कबुलीवर आधारित आहे.

१७. Plea Bargaining स्वीकारणे हा आरोपीस शिक्षा पूर्णपणे माफ करण्याचा मार्ग नाही. Plea Bargaining चा उद्देश प्रकरणाचा जलद, न्याय्य व कायदेशीर पद्धतीने निपटारा करणे हा आहे. आरोपीने या प्रक्रियेद्वारे न्यायालयीन वेळ व संसाधनांची बचत केली आहे, ही बाब त्याच्या शिक्षेच्या प्रमाणात विचारात घेणे आवश्यक आहे. मात्र, त्याचा अर्थ असा होऊ शकत नाही की, विशेष कायद्याने प्रतिबंधित केलेल्या अपराधासाठी कोणतीही वास्तविक दंडात्मक परिणती राहणार नाही. कायद्याच्या प्रतिबंधात्मक उद्देशास प्रभावी करण्यासाठी आरोपीस काही प्रमाणात प्रत्यक्ष शिक्षा व आर्थिक दंड होणे आवश्यक आहे.

१८. या न्यायालयाच्या मते, सदर प्रकरणात आरोपीस पूर्णपणे probation वर सोडल्यास महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमाच्या प्रतिबंधात्मक उद्देशास अपेक्षित परिणामकारकता प्राप्त होणार नाही. आरोपी प्रथम अपराधी आहे,

त्याची Plea Bargaining करण्याची स्वेच्छा सिद्ध झाली आहे, त्याने अपराध कबूल केला आहे, प्रकरण दीर्घकाळ प्रलंबित आहे आणि त्याने न्यायालयीन कार्यवाहीत सहकार्य केले आहे, या सर्व बाबी लक्षात घेऊन त्यास कठोर कारावासाची शिक्षा देणेही आवश्यक किंवा प्रमाणबद्ध ठरणार नाही. या दोन्ही टोकांच्या परिस्थितींमध्ये संतुलन साधण्यासाठी न्यायालय उठेपर्यंतची शिक्षा व वाजवी आर्थिक दंड ही शिक्षा अधिक योग्य व न्याय्य ठरते.

**१९.** कलम ९ अंतर्गत शिक्षेच्या बाबतीत कायद्यात किमान कारावासाची तरतूद असली तरी, विशेष व पर्याप्त कारणे नोंदविल्यास त्यापेक्षा कमी कालावधीची शिक्षा देण्याची तरतूद आहे. सदर प्रकरणात आरोपी प्रथम अपराधी आहे; त्याच्याविरुद्ध पूर्वीची दोषसिद्धी अभिलेखावर नाही; त्याने स्वतःहून Plea Bargaining चा अवलंब केला आहे; त्याने आपल्या विधिज्ञाच्या उपस्थितीत व पूर्ण समजुतीने आरोप कबूल केले आहेत; त्याच्यावर कोणताही दबाव, धमकी, प्रलोभन किंवा अनुचित प्रभाव नसल्याचे न्यायालयास समाधान झाले आहे; प्रकरण सन २०१९ पासून प्रलंबित आहे; आरोपीने जवळपास आठ वर्षे न्यायालयीन प्रक्रियेला सामोरे जाण्याची मानसिक व आर्थिक झळ सोसली आहे; तसेच Plea Bargaining मुळे पुढील न्यायालयीन वेळ व सार्वजनिक संसाधनांची बचत झाली आहे. या सर्व बाबी एकत्रितपणे विशेष व पर्याप्त कारणे ठरतात.

२०. या सर्व परिस्थितींचा एकत्रित विचार करता, आरोपीस दीर्घकालीन कारावासाची शिक्षा देणे हे सदर प्रकरणातील परिस्थितीच्या तुलनेत आवश्यक व प्रमाणबद्ध ठरणार नाही. त्याचवेळी, आरोपीस पूर्णपणे probation वर सोडणेही या न्यायालयाच्या मते योग्य ठरणार नाही. त्यामुळे आरोपीस न्यायालय उठेपर्यंतची शिक्षा व आर्थिक दंड देणे हा न्यायाच्या दृष्टीने समतोल व पर्याप्त उपाय आहे. अशा शिक्षेमुळे आरोपीस त्याच्या स्वेच्छेच्या दोषकबुलीचा व प्रथम अपराधी असल्याचा लाभ मिळतो आणि त्याचवेळी कायद्याच्या प्रतिबंधात्मक उद्देशालाही आवश्यक तो दंडात्मक परिणाम प्राप्त होतो.

२१. दंडाच्या प्रमाणाबाबत विचार करता, आरोपीविरुद्धचा अपराध हा विशेष कायद्यातील प्रतिबंधात्मक तरतुदींच्या उल्लंघनाशी संबंधित आहे. आरोपीने अपराध कबूल करून Plea Bargaining स्वीकारली असली तरी केवळ नाममात्र दंड देणे या प्रकरणात पर्याप्त ठरणार नाही. आरोपीचा प्रथम अपराध, त्याची आर्थिक व वैयक्तिक परिस्थिती, दीर्घकाळ प्रलंबित असलेले प्रकरण, त्याने केलेली स्वेच्छेची कबुली व न्यायालयीन कार्यवाहीस दिलेले सहकार्य या बाबींचा विचार करून कलम ५–अ शी संबंधित अपराधासाठी रुक्कम रु.८,०००/– व कलम ५–क शी संबंधित अपराधासाठी रुक्कम रु.२,०००/– दंड निश्चित करणे योग्य व प्रमाणबद्ध आहे. एकूण रुक्कम रु.१०,०००/– दंड हा कायद्याने अनुमत मर्यादेत असून, सदर अपराधाचे

स्वरूप व Plea Bargaining मधील आरोपीचे सहकार्य यांचा संतुलित विचार करून निश्चित करण्यात येत आहे.

२२. वरील सर्व कारणांमुळे आरोपीने Plea Bargaining चा अर्ज स्वेच्छेने दाखल केला असून, त्यास त्याच्याविरुद्ध असलेल्या आरोपांचे स्वरूप, कायदेशीर परिणाम व संभाव्य शिक्षेचे स्वरूप पूर्णपणे समजलेले आहे, याबाबत या न्यायालयाचे समाधान झाले आहे. आरोपीने कोणत्याही दबाव, धमकी, प्रलोभन किंवा अनुचित प्रभावाशिवाय आरोप स्वीकारले आहेत. त्यामुळे आरोपीस Plea Bargaining च्या कार्यवाहीत दोषी ठरविणे योग्य आहे. तथापि, अपराधाचे स्वरूप व संबंधित विशेष कायद्याचा प्रतिबंधात्मक उद्देश लक्षात घेता त्यास probation वर सोडणे योग्य नाही. त्याचवेळी, आरोपीच्या प्रथम अपराधी असण्याची बाब, स्वेच्छेची कबुली, Plea Bargaining मधील सहकार्य, दीर्घ प्रलंबितता आणि न्यायालयीन वेळेची बचत या सर्व बाबींचा लाभ देऊन कठोर कारावासाऐवजी न्यायालय उठेपर्यंतची शिक्षा व वाजवी दंड देणे हे न्याय्य व प्रमाणबद्ध ठरते.

## <u>आ दे श</u>

१. आरोपी **इसराईल कुरेशी नाजीर कुरेशी**, यास फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम २६५–ई व २६५–एफ अन्वये Plea Bargaining च्या कार्यवाहीत केलेल्या स्वेच्छेच्या दोषकबुलीनुसार **महाराष्ट्र प्राणी संरक्षण**

**अधिनियम, १९७६ चे कलम ५–अ व ५–क अन्वये दंडनीय अपराधासाठी कलम ९ अन्वये दोषी ठरविण्यात येते.**

२. आरोपीस कलम ९ अन्वये **न्यायालय उठेपर्यंतची (Imprisonment till rising of the Court) व रुक्कम रु. ८,०००/– (रुपये आठ हजार मात्र) दंड**, अशी शिक्षा सुनावण्यात येते. सदरील दंड न भरल्यास दहा दिवसाचा साधा कारावास भोगावा लागेल.

३. आरोपीस कलम ९–अ अन्वये **न्यायालय उठेपर्यंतची शिक्षा (Imprisonment till rising of the Court) व रुक्कम रु.२,०००/– (रुपये दोन हजार मात्र) दंड**, अशी शिक्षा सुनावण्यात येते. सदरील दंड न भरल्यास तिन दिवसाचा साधा कारावास भोगावा लागेल.

४. वरील दोन्ही कारावासाच्या शिक्षा **एकाच वेळी (concurrently)** भोगावयाच्या राहतील.

५. जप्त मुद्देमाल **१.** एक लोखंडी धारधार सुरा अंदाजे १५ इंच लांबीचा १० इंच पाते व ५ इंच लोखंडी पकड असलेली मुठ, **२.** एक लोखंडी धारधार सुरा १२ इंच लांबीचा ८ इंच पाते, ४ इंच लोखंडी पकड असलेला, **३.** एक लोखंडी धारधार सुरा १६.५ इंच लांबी चा ११ इंच पाते, ५.५ इंच लोखंडी पकड हा मुद्देमाल मुल्यहिन असल्याने **अपील कालावधी संपल्यानंतर**

**कायदेशिर मार्गाने विल्हेवाट लावावी**.

६. Plea Bargaining च्या कार्यवाहीत पारित झालेल्या या निकालाची अंतिमता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम **२६५–जी** अन्वये राहील.

७. या निकालाची प्रमाणित प्रत आरोपीस **विनामूल्य** देण्यात यावी.

Digitally signed by NILESH LAXMANRAO PATIL
Date: 2026.08.11 16:58:59 +0530

**दिनांक –११/०८/२०२६**

**ठिकाण –** दारव्हा, जि. यवतमाळ

**(निलेश ल. पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय. क्र. २), दारव्हा

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| **Name of Stenographer** | :- | Ku Divya R. Gaikwad<br>Stenographer (Grade 3) |
| **Court Name** | :- | 2nd Jt. CJJD & JMFC Darwha |
| **Date** | :- | 11/08/2026 |
| **Judgment signed by presiding officer on** | :- | 11/08/2026 |
| **Judgment uploaded on** | :- | 11/08/2026 |